महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

फोन नं. ०२२-२२६२०६६८, ६९, ७० फॅक्सः ०२२ २२६२०७८९ संकेत स्थळः www.gdcmumbai.org

## जाहिरात

सर्व संबंधितांना अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई मार्फत कळविण्यांत येते कि, शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ करिता भारतीय दंत परिषदेमार्फत मान्यताप्राप्त खालील नमुद पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१) पदविका अभ्यासक्रम दंतआरोग्यक** Diploma Course in Dental Hygienist **कालावधी २ वर्षे**

**२) पदविका अभ्यासक्रम दंततंत्रज्ञ** Diploma Course in Dental Mechanic **कालावधी २ वर्षे**

प्रवेश अर्जाचा विहित नमुना या महाविद्यालयाचे संकेत स्थळः www.gdcmumbai.org अथवा व्यक्तिशः विद्यार्थी विभाग, खोलीक्रमांक ०९, तळमजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलोरोड, छत्रपती शिवाजी टर्मिनस शेजारी, मुंबई ४०० ००१ येथे दिनांक २२.०६.२०१८ ते दिनांक०६.०७.२०१८ सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) उपलब्ध होईल.

**सदर दोन्ही पदविका अभ्यासक्रमाकरिता लागणारी प्रवेश पात्रता -**

**अ)शैक्षणिक अर्हता** - उमेदवारांनी बारावी उच्च माध्यमिक शिक्षण प्रमाणपत्र विज्ञान शाखा अथवा तत्सम परिक्षा, महाराष्ट्रातील संस्थेतून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (PCB)विषय घेऊन उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

**ब)वयोमर्यादा** - प्रवेश घेतेवेळी उमेदवाराचे वय कमीतकमी १७ वर्षे किंवा पुढील ३ महिन्यात १७ वर्षे पूर्ण होणे बंधनकारक आहे.

प्रवेश अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांनी खालील नमुद अत्यावश्यक मुळ प्रमाणपत्राच्या छायाप्रति स्वयं साक्षांकन करुन व्यक्तिकरित्या किंवा टपालाने शुक्रवार दिनांक ०६.०७.२०१८ रोजी किंवा त्यापूर्वी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात प्राप्त होणे बंधनकारक राहिल. विहित तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**सोबत जोडावयाच्या प्रमाणपत्राची यादी,**

१) शाळा सोडल्याचा दाखला.
२) इयत्ता दहावी उत्तीर्णचे प्रमाणपत्र.
३) इयत्ता बारावीची गुणपत्रिका.
४) इयत्ता बारावी प्रयत्न प्रमाणपत्र.
५) शारीरिक दृष्ट्या सक्षम असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
६) जात व जात वैधता प्रमाणपत्र.(मागास वर्गीय विद्यार्थ्यांकरिता)
७) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे चालू (आर्थिक वर्ष २०१८-१९) प्रमाणपत्र आवश्यक आहे. (इ.मा.व., वि.ज.(अ), भ.ज.(ब.क.ड.)
८) महाराष्टात राहत असल्याचे अधिवास प्रमाणपत्र व राष्ट्रीत्वचा दाखला.
९) जे विद्यार्थी बारावी (१०+ २) अथवा तत्सम परिक्षा (विज्ञान शाखा) उत्तीर्ण झाल्यानंतर काही वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज करित असतील अश्या विद्यार्थ्यांनी हमीपत्र (Affidavit) देणे आवश्यक आहे.
१०) आधार कार्ड.

अपूर्ण व उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही किंवा त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

महत्वाच्या सुचना

१) या दोन्ही पदविका अभ्यासक्रमाकरीता स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक राहिल.
२)शैक्षणिक शुल्कात बदल करण्यांची बाब शासन स्तरावर विचाराधीन असून त्यात बदल झाल्यास तो प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

अधिष्ठाता
शासकीय दंतमहाविद्यालय व रुग्णालय, मुंबई १.